# कर्जबाजारी शेतकऱ्याची विष प्राशन करून आत्महत्या

## जामगाव (बु.) येथील घटना

## हातातून सोयाबीन पीक गेल्याच्या नैराश्यातून उचलले टोकाचे पाऊल

**पुण्य नगरी / प्रतिनिधी**

**वरोरा (चंद्रपूर) : पिकावर रोगाचा प्रादुर्भाव व अतिवृष्टीमुळे हातातून सोयाबीन पीक गेल्याच्या नैराश्यातून जामगाव (बु.) येथील कर्जबाजारी शेतकऱ्याने १३ ऑक्टोबर रोजी विष प्राशन केले होते. त्याचा १४ ऑक्टोबर रोजी चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. केशव देवराव आसुटकर (४८) असे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे.**



मृतक केशव आसुटकर यांच्या नावे साडेतीन एकर कोरडवाहू शेती आहे. यातील दीड एकर शेतीमध्ये त्यांनी सोयाबीन तर दोन एकर शेतीमध्ये कपाशीची लागवड केली होती. परंतु, यावर्षी विविध रोगांचा प्रादुर्भाव आणि अतिपावसामुळे सोयाबीन पिकाचे अतोनात नुकसान झाले. हातचे पीक गेल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा, कर्ज कसे फेडायचे आणि दिवाळीचा सण कसा साजरा करायचा, असा प्रश्न त्यांच्यासमोर होता. या विवंचनेतून त्यांनी १३ ऑक्टोबर रोजी दुपारी दोनच्या सुमारास स्वतःच्या शेतात विष प्राशन केल्याचे म्हटले जाते. ही माहिती मिळताच नातेवाईक आणि गावातील काही व्यक्तींच्या मदतीने त्यांना वरोरा उपजिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले. परंतु, प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आले. १४ ऑक्टोबर रोजी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. मृत्यू पश्चात पत्नी अर्चना व दोन मुली असा आप्तपरिवार आहे. एक मुलगी कॉम्प्युटर सायन्समध्ये पॉलिटेक्निक करीत असून, ती तृतीय वर्षाला आहे तर दुसरी मुलगी इलेक्ट्रिकलमध्ये बी. टेक करीत असून, ती प्रथम वर्षाला शिक्षण घेत आहे. केशव यांच्या शेतीवर एक लाख पाच हजार रुपयांचे सोसायटीचे कर्ज असून, इतरही काही व्यक्तींकडून त्यांनी कर्जरूपात रक्कम घेतली असल्याचे म्हटले जाते. वरोरा पोलिसांनी घटनेची नोंद घेऊन तपास सुरू केला आहे.


**MAHAVITARAN** Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## e-TENDER NOTICE

Super scribed & sealed offer in Two Bid system are invited from reputed firms / contractors / Company **for providing outsourced technical man power (Technician / Operator / Attendant) under O&M Akola Circle (T-04 - Rs. 250 Lakhs, T-05 - Rs. 220 Lakhs & T-06 – 90 Lakhs).** The e-Tender details / documents for above tender are available on website on www.etender.mahadiscom.in The cost of e-tender is **Rs. 5900/-** each including GST (each tender). Submit the tender duly filled in on or before **29.10.2025** up to 17.30 Hrs. The e-Tender documents can be downloaded from aforesaid website from **15.10.2025.** If any changes in the e-tender, prospective bidders are requested to regularly check the website. Contact No. 7875763335.

**HOPR No. 220/2025**

**Superintending Engineer, O&M Circle, Akola**

### शुद्धीपत्रक क्र. ०२

वर्धा विभागातील विविध बसस्थानकावरील वाणिज्य आस्थापनांकरीता मोहोरबंद - निविदा सुचना क्र. ०४/२०२५ पत्र क्र. ३३६२, दि. १९/०९/२०२५ नुसार निविदा काढण्यात आलेली होती. सदर निविदेमधील एकुण १० वाणिज्य आस्थापनांपैकी १० वाणिज्य आस्थापनेला अल्प प्रतिसाद आल्याने प्रथम मुदतवाढ देण्यात आलेली होती. एकुण १० वाणिज्य आस्थापनेला अल्प प्रतिसाद आल्याने अंतिम मुदतवाढ (द्वितीय मुदतवाढ) देण्यात येत असुन उपरोक्त निविदांचा सादरीकरणाचा कालावधी हा दिनांक २८/१०/२०२५ वेळ १६.०० वाजेपर्यंत वाढविण्यात आला आहे. तसेच सदर निविदा (शक्य असल्यास) उघडण्याचा दिनांक २९/१०/२०२५ राहील. उर्वरीत निविदेत कोणताही बदल नाही. सदर निविदा फार्मची विक्री दि. २८/१०/२०२५ रोजी १५:०० वाजेपर्यंत सुरू राहील. निविदा फार्मसाठी कार्यालयीन वेळेत, विभाग नियंत्रक, रा.प. विभागीय कार्यालय, सेवाग्राम रोड, औद्योगीक परिसर, वर्धा येथे संपर्क साधावा.

**विभाग नियंत्रक, रा.प. वर्धा**

**MAHAGENCO** Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## e-Tender-Notice

Online tenders are invited in two bids at O/o The Chief Engineer (Project), MSPGCL, Koradi.
Email id: etenderingkrdproj@mahagenco.in
Sale of Bid document: From 14/10/2025 to 22/10/2025.
Last date of submission of Bid: 22/10/2025.
Cost of above Tender will be Rs. 1,180/-.

| Sr. No | e-Tender No | Subject | EMD / Estimated Value (In Rs/-) |
|---|---|---|---|
| 1 | RFx-3000062459 | Hiring of closed vehicles at Koradi Project office. | 56,000/- 52,47,150/- |

a. Further details pertaining to above tenders are available on website https://eprocurement.mahagenco.in.
b. Any amendment to this notice and / or notification of amendment in bidding document shall be notified on above website only. Potential bidders are requested to make a note of the same.

**Chief Engineer (Project),**
Koradi Project, MSPGCL, Koradi

## नगरपरिषद मोवाड, जि. नागपूर

### नगरपरिषद मोवाड सार्वत्रिक निवडणूक २०२५

### जाहीर सूचना

मोवाड नगरपरिषदेच्या सन २०२५ मध्ये होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभागनिहाय प्रारूप मतदारयाद्या तयार करण्यात आलेल्या असून एकूण सर्व १० प्रभागांच्या याद्या नगरपरिषद कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येत आहे. प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचनांसाठी खालीलप्रमाणे वेळापत्रक जाहीर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करणे | बुधवार, दिनांक : ०८ ऑक्टोबर २०२५ |
| २ | प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | बुधवार, दिनांक : ०८ ऑक्टोबर २०२५ ते शुक्रवार, दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ पर्यंत |
| ३ | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करून प्रसिद्ध करणे | शुक्रवार, दिनांक : ३१/१०/२०२५ |
| ४ | मतदान केंद्रांची यादी प्रसिद्ध करणे व केंद्रनिहाय मतदार याद्या प्रसिद्ध करणे | शुक्रवार, दिनांक ७/११/२०२५ |

**टीप :** हरकती व सूचना दाखल करणाऱ्यांना आवश्यक अर्जाचा नमुना - 'अ', व नमुना 'ब' नगरपरिषद मोवाड कार्यालयात उपलब्ध आहे.

वरीलप्रमाणे वेळापत्रकानुसार विहित मुदतीत हरकती व सूचना स्वीकृत केल्या जातील. मुदतीखेरीज कोणाचेही अर्ज विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**ठिकाण : मोवाड**
**दिनांक : १४ ऑक्टोबर २०२५**

**सही/-**
**(अमोल परिहार)**
**मुख्याधिकारी, नगरपरिषद, मोवाड**


# डॉ. सारा जॉर्ज यांना जीवनगौरव पुरस्कार

**नवी दिल्ली :** भारतातील शिक्षण क्षेत्रात चार दशकांहून अधिक काळ योगदान देणाऱ्या प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ आणि पॉल जॉर्ज ग्लोबल स्कूल आणि सेंट जॉर्ज स्कूलच्या संचालिका डॉ. सारा जॉर्ज यांना हेल्पिंग गुरूज या अग्रगण्य संस्थेच्या वतीने ५वा 'लाइफटाइम अचिव्हमेंट अ‍ॅवॉर्ड' प्रदान करण्यात आला. नवी दिल्ली येथे आयोजित विशेष समारंभात राजदूत दीपक वोहरा (माजी भारतीय राजनैतिक व भारत-आफ्रिका विशेष सल्लागार) यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हेल्पिंग गुरूज ही संस्था भारतातील के-१२ शिक्षण क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणाऱ्या आणि १०,००० पेक्षा अधिक शाळांच्या नेटवर्कद्वारे काम करणारी प्रमुख संस्था आहे. शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवणाऱ्या, उत्कृष्टतेचा ध्यास घेणाऱ्या आणि नव्या पिढीला प्रेरणादायी दिशा देणाऱ्या दूरदर्शी व्यक्तिमत्त्वाला हा पुरस्कार दिला जातो.

या वेळी राजदूत वोहरा म्हणाले की 'डॉ. जॉर्ज करुणा, उद्देश आणि प्रामाणिकतेसह तरुण मने घडवणाऱ्या दूरदर्शी शिक्षिका आहेत.

एक प्रगल्भ शिक्षिका आणि संस्थापिका म्हणून, डॉ. सारा जॉर्ज यांनी १९८२ पासून शिक्षण क्षेत्रात मार्गदर्शक म्हणून कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली सेंट जॉर्ज स्कूल आणि २०१५ पासून पॉल जॉर्ज ग्लोबल स्कूल या संस्थांनी सर्वांगीण शिक्षण, मूल्यसंस्कार क्षेत्रात आदर्श निर्माण केला आहे. गेल्या अनेक दशकांमध्ये त्यांनी १,००,००० हून अधिक विद्यार्थी आणि १,००० शिक्षक घडवले आहेत.


## जाहीरनामा

ज्याअर्थी श्रीमती प्रियंका सुजित वाघाडे, रा. ८ वा मैल, दवलामेटी, तह. जि. नागपूर यांनी त्यांचे पती सुजित प्रकाश वाघाडे यांचा जन्म दिनांक १२/०७/१९९० रोजीची नोंद ग्रामपंचायत दवलामेटी, तह. नागपूर ग्रा., जि. नागपूर येथे घेण्याकरिता या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

त्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. १, २, ३ व ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीच्या जन्माबाबत नोंद घेण्याकामाचा आदेश देण्याकरिता व गृहचौकशी करण्याकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी ते पुरावे किंवा साक्षीदारासह तहसील कार्यालय, नागपूर ग्रा. येथे जातीने/वकिलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनाम्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्माबाबतची नोंद घेण्याकामीचा आदेश देण्याबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबत आदेश निर्गमित करण्यात येईल.

(शिक्का) **(कल्याणकुमार डहाट)**
**तहसीलदार, नागपूर (ग्रा.)**

## जाहीर सुचना

सर्व आम जनतेस या जाहीर सुचनेद्वारे सुचित करण्यात येत आहे की, **मौज एसांबा, तह. पारशिवनी, जिल्हा नागपूर येथील शेत सर्व्हे क्र. १०६, आराजी १.२८ हे.आर आणि मौजा वराडा, तह.पारशिवनी, जिल्हा नागपूर येथील शेत सर्व्हे क्र. ६६, आराजी ०.८८ हे.आर** ह्या दोन्ही शेतजमीनी माझे मालकी ताब्यातील शेतजमीनी आहेत. सदर ह्या शेतजमीनी मी विकण्यास इच्छुक असून विक्री व्यवहारात जाण्या आदी सदर मालमत्तेचे मालकी हक्काची पडताळणी करून घेण्याचे हेतुने ही नोटीस प्रकाशित करण्यात येत आहे. तरी जर कुणास उपरोक्त शेतींच्या मालकी हक्का संबंधी कुठलेही आक्षेप उजर असल्यास किंवा यावर कुणाचे बोझा, करारनामा, वारस हक्क, न्यायालयीन वाद इत्यादी कुठलेही संबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रकाशित झाल्याचे **७ दिवसाचे आत** लेखी पूराव्यासह संपर्क साधावा. मुदतीनंतर कुणाचेही कुठलेही आक्षेप आक्षेप उजर ऐकुन घेतले जाणार नाही व सदर मालमत्ता पूर्णपणे निर्वेध आहे असे गृहीत धरल्या जाईल. याची सर्व जनतेने व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

नागपूर - दि. १५/१०/२०२५

**हेमलता चवरे**
**रा. गणेश नगर, वर्धा**
**मो. 9923114967, 9922364998**

**Godrej Housing Finance Limited** Godrej | HOUSING FINANCE A Godrej Capital Company

### सार्वजनिक सूचना

**'गोदरेज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड' द्वारे १७ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या मास्टर डायरेक्टेशन - नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी - हाऊसिंग फायनान्स कंपनी (रिझर्व्ह बँक) डायरेक्टेशन्स, २०२१ च्या परिच्छेद ९३ नुसार जाहीर केलेली सूचना, जी वेळोवेळी अद्यतनित केली जाते.**

**गोदरेज हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** ("कंपनी" किंवा "GHFL") ही कंपनी कायदा, २०१३ (कॉर्पोरेट ओळख क्रमांक: U65100MH2018PLC315359) अंतर्गत स्थापन झालेली एक सार्वजनिक मर्यादित कंपनी आहे आणि ती भारतीय रिझर्व्ह बँकेत (COR. क्रमांक: DOR - 00184) नॉन-डिपॉझिट स्वीकारणारी नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनी - हाऊसिंग फायनान्स कंपनी ("NBFC - HFC") म्हणून नोंदणीकृत आहे. GHFL चे नोंदणीकृत कार्यालय गोदरेज वन, पिरोजशानगर, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, विक्रोळी (पूर्व), मुंबई - ४०००७९, महाराष्ट्र येथे आहे.

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीचे पाठक हाऊस, दुसरा मजला, युनिट क्रमांक २०४, प्लॉट क्रमांक ८४ आणि ८५, अभयंकर नगर रोड, व्हीएनआयटी जवळ, नागपूर- ४४००१०, महाराष्ट्र येथील शाखा कार्यालय हे कामकाजाच्या कारणास्तव, या सूचनेच्या तारखेपासून ३ महिन्यांच्या कालावधीत माय ब्रांच सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, पहिला मजला, घर क्रमांक-५५२, वॉर्ड क्रमांक-७०, प्लॉट क्रमांक-जी १२१/१, गोरेपेठ, धरमपेठ विस्तार, नागपूर- ४४००१०, महाराष्ट्र येथे स्थलांतरित केले जाणार आहे.

ग्राहकांच्या सर्व शंकांची उत्तरे customercare@godrejcapital.com या ईमेल आयडीवर दिली जातील.

या संदर्भात कोणतेही स्पष्टीकरण किंवा चौकशी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात श्री. योगेश जैन, मुख्य अनुपालन अधिकारी यांना पाठवलेल्या या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या कालावधीत किंवा compliance@godrejhf.com वर संपर्क साधू शकतात.

Sd/-
गोदरेज हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या वतीने

स्थळ: मुंबई
दिनांक: 15.10.2025


## मादागास्करमध्ये जनता रस्त्यावर, राष्ट्रपती परागंदा



**अंतानानारिवो :** हिंद महासागरातील एक बेट असलेल्या मादागास्कर देशात सरकारविरोधात जनता रस्त्यावर उतरली असून, राष्ट्रपती एँड्री राजोइलिना देश सोडून पळून गेले आहेत. वीज कपात आणि पाण्याचा तुटवडा या मुद्द्यांवर जनता आक्रमक झाली आहे. जनतेचा हा उठाव म्हणजे सत्तापालटाचा कट असल्याचा आरोप करत फरार राष्ट्रपतींनी संसदेचे कनिष्ठ सभागृह विसर्जित केले आहे. मादागास्करमध्ये नेपाळप्रमाणेच सरकारविरोधात जेन-झी आंदोलन सुरू आहे. या जनआंदोलनाला लष्कराच्या एका गटाचाही पाठिंबा आहे. त्यामुळे राष्ट्रपती राजोइलिना यांनी देशाबाहेर पळ काढला आहे. सोमवारी रात्री त्यांनी सोशल मीडियावरून एक भाषण करत आपण जीव वाचवण्यासाठी देशाबाहेर गेल्याचे सांगितले. मात्र त्यांनी ठावठिकाणा सांगितला नाही. सूत्रांच्या माहितीनुसार ते फ्रान्समध्ये आश्रयाला गेले आहेत.


## अधिसुचना प्रशासक तथा मुख्याधिकारी नगरपरिषद, वरूड यांच्याकडून

वरुड शहराची विकास योजना शासनाचे नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक-टीपीएस २८०३/१८९३/सी.आर_८सी (ए)/२००४/यु.डी.-३० नुसार दि १५ जुलै २००५ रोजी भागशः मंजूर झालेली असून ती दिनांक ०१ सप्टेंबर २००५ पासुन अमलात आली आहे व शासनाचे नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्रमांक टीपीएस-२८०६/३७९/प्र.क्र. २४३/२००६ / ई.पी. मंजुरी, दि. ०६ जून २००७ ला वगळलेल्या भागाची विकास योजना मंजूर झालेली असून ती दि.१६ जुलै २००७ पासून अमलात आलेली आहे.

वरुड नगरपरिषदेच्या मा. प्रशासक यांचा समोरील सभा, दि. ११/०९/२०२५ चा ठराव क्रमांक ९० अन्वये ठरविल्याप्रमाणे उपरोक्त मंजूर विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये खाली दिलेल्या तपशिल प्रमाणे बदल प्रस्तावीत केला आहे.

| अ.क्र. | खसरा क्रमांक | क्षेत्रफळ | विकास योजनेतील मंजूर उपयोग | फेर बदल झाल्यानंतर होणारा प्रस्तावित उपयोग |
|---|---|---|---|---|
| १ | मौजा - वरुड भाग-१ सर्व्हे क्र. ४८९/१,४८९/२ | ४.२४ हे. आर. | ना-विकास क्षेत्र / कृषी क्षेत्र | रहिवासी |

उपरोक्त फेर बदल दर्शविणारा नकाशा व त्यासंबंधीची माहिती बाबतचा अहवाल वरुड नगरपरिषदेच्या कार्यालयात कामकाजाचे वेळेत अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये असे उद्घोषीत करण्यात येते कि, सदर फेर बदलासंबंधी कोणाला काही हरकती / सुचना असतील त्यांनी हि अधिसुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून १ महिण्याचे आत प्रशासक तथा मुख्याधिकारी नगरपरिषद वरुड यांचेकडे लेखी सादर कराव्यात. आवश्यक सुचना व हरकतीवर सदरहु फेर बदलाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यापुर्वी योग्य तो विचार केला जाईल.

वरुड
कार्यालय नगरपरिषद, वरुड
क्रमांक - न.प. वरुड/वियो /१९५३/२०२५
दिनांक १३/१०/२०२५

**(गजानन भोयर)**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**नगर परिषद, वरूड**

परिशिष्ट-अ-१

## भारत निवडणूक आयोग

### नागपूर विभाग पदवीधर मतदार संघ महाराष्ट्र विधान परिषद करीता मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे नियम ३१ (४) अन्वये सूचना

मतदार नोंदणी अधिनियम १९६० चे नियम ३१ (४) अन्वये मतदार नोंदणी अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ३० सप्टेंबर २०२५ च्या सूचनापत्राद्वारे नागपूर विभाग पदवीधर मतदार संघात मतदार म्हणून नोंदणी करण्यास पात्र असलेल्या व्यक्तींनी ते दिनांक ०६ नोव्हेंबर २०२५ रोजी अथवा त्यापूर्वी नमूना १८ मध्ये अर्ज भरून त्यांच्या कार्यालयात पाठवू अथवा दाखल करून शकतात. नमूना १८ मधील अर्जाचा नमूना दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजीच्या दैनिक लोकमत व दैनिक हितवाद या वृत्तपत्रात मतदार नोंदणी नियम १९६० मधील तरतुदीनुसार अनुसूची-२ म्हणून प्रसिद्ध केला आहे.

वर नमूद सर्व पात्र व्यक्ती नमुना-१८ मधील अर्ज यापूर्वी सादर केले नसल्यास दिनांक ०६ नोव्हेंबर २०२५ रोजी अथवा त्यापूर्वी सादर करू शकता.

या विषयीचा तपशील मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांचे कार्यालयीन संकेतस्थळ https://ceoelection.maharashtra.gov.in/ceo/Graduates-and-Teachers-Constituencies-2025.aspx वर सुद्धा उपलब्ध आहे.

**सही/-**
**(विजयलक्ष्मी बिदरी)**
**मतदार नोंदणी अधिकारी**
**नागपूर विभाग पदवीधर मतदार संघ तथा विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर**

**ठिकाण- नागपूर**
**दिनांक- १५/१०/२०२५**
डीजीआयपीआर/२०२५-२०२६/क्र.५/C-३१८२

## NOTIFICATION BY THE ADMINISTROR AND CHIEF OFFICER OF NAGAR PARISHAD, WARUD

The Development plan of Warud has already been partly sanctioned by the Government Urban Dvelopment Department-Mumbai Vide resolution No. TPS 2803/1893/CR-8C(A)/2004/UD-30, Dated 15th July 2005 with effect from 1st September 2005 and Vide resolution No. TPS-2418/1054/CR-169/2018/EP Sanction, Dated 06st June 2007 Excluded part development Plan which came in force with effect from 16st July 2007.

The Nagar Parishad Warud has proposed to make modification under Maharashtra Regional and Town Planning Act 1966 Clause 37 (1) in the aforesaid final Development Plan vide its General Committee resolution No. 90, Dated 11/09/2025 as below.

| S.N | Kh.No. | Area | Present Use As Per Development Plan | Proposed Use After Modification Proposed |
|---|---|---|---|---|
| 1 | Mauza Warud part-1 Survey No. 489/1,489/2 | 4.24 hectare | No Development Zone/ Agricultural Zone | Residential |

The Plan and reports containing the description of the above minor modification can be seen in the office of the Nagar Parishad Warud during the office hours.

Now in pursuance of section 37 (1) of Maharashtra Regional and Town Planning Act 1966 it is hereby notified that any person having any suggestion or objection to the proposed modification as details above shall communicate the same in writing to the undersigned within one month from the date on which this notification Publish in the official gazzett.

The objection or suggestion if any received within the above mentioned period of one month will be considered by administrator and chief officer of the nagarparishad Warud while submitting the proposed modification to the Government for sanction.

Warud
NO-N.P. Warud/DP/-1953/2025
Dated-13/10/2025

**(Gajanan Bhoyar)**
**Administrator and Chief officer**
**Nagar Parishad, Warud**

## नगरपरिषद डिगडोह (देवी) सार्वत्रिक निवडणूक - २०२५

### प्रारूप मतदार यादी प्रसिद्धीबाबत जाहीर सूचना

नगरपरिषद डिगडोह (देवी) च्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादीचा सुधारित कार्यक्रम खालीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | बुधवार, दिनांक ०८/१०/२०२५ ते शुक्रवार, दिनांक १७/१०/२०२५ |
| २ | अंतिम प्रभागनिहाय याद्या अधिप्रमाणित करून प्रसिद्धी करणे. | शुक्रवार, दिनांक ३१/१०/२०२५ |
| ३ | मतदान केंद्राची यादी प्रसिद्ध करणे आणि मतदान केंद्रनिहाय मतदार याद्या प्रसिद्ध करणे. | शुक्रवार, दिनांक ०७/११/२०२५ |

वरीलप्रमाणे वेळापत्रकानुसार विहित मुदतीत हरकती व सूचना स्वीकृत केल्या जातील. मुदतीखेरीज कोणाचेही अर्ज विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**स्थळ :** डिगडोह (देवी)
**दिनांक :** १४/१०/२०२५

**(रामेश्वर पांडागळे)**
**मुख्याधिकारी,**
**नगरपरिषद, डिगडोह (देवी)**

## नगर परिषद कार्यालय, यवतमाळ

कार्यालय दुरध्वनी क्र.:- (०७२३२) २४४०३७, २४४५६६ ई मेल आय. डी -npyavatmal@gmail.com

जा.क्र./न.प.य./स्वच्छता विभाग/निविदा सूचना/२९५/२०२५ दिनांक : १३/१०/२०२५

### ई-निविदा सुचना (प्रथम वेळ

सर्वसाधारण माहितीकरिता ई - निविदा सुचना प्रसिध्द करण्यात येते की, नगर परिषद यवतमाळ घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत सावरगड स्थित घनकचरा प्रक्रिया केंद्र येथील जुन्या साठलेल्या कच-यावर Biomining पध्दतीने प्रक्रिया करणे या कामाकरिता निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता करू शकत असलेल्या कुठल्याही सक्षम पुरवठादाराकडून ई-निविदा ( व्दिलिफाफ्यात) मागविण्यात येत आहे. सदर ई - निविदेची सविस्तर माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १३/१०/२०२५ ते दिनांक २३/१०/२०२५ रोजीपर्यंत पहावयास मिळेल. ई-निविदेचा Tender ID- 2025 DMA_1228892_1 हा आहे.

करिता ई-निविदा सुचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

**स्वा./....**
**(शुभम क्यातमवार)**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद यवतमाळ**

## कार्यालय नगर परिषद वरोरा

क्रमांक वशी/नपनिवड /२०२५/०१९ दिनांक : १४/१०/२०२५

### जाहीर सुचना

### नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक - २०२५

नगर परिषद क्षेत्रातील सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, मा. राज्य निवडणूक आयोग, मुंबई यांचे पत्र क्र. रानिआ/नय-२०२५/प्र.क्र.०९/का-६, दिनांक १३/१०/२०२५ अन्वये नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदारयादीचा सुधारीत कार्यक्रम २०२५ जाहिर केलेला असुन त्यानुसार १३ प्रभागाची प्रारूप प्रभाग निहाय मतदार यादी दिनांक ०८/१०/२०२५ ला न.प. कार्यालय वरोरा येथील नोटीस बोर्ड संकेतस्थळवर प्रसिध्द करण्यात आली आहे. तरी इच्छुक नागरिकांना प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करावयाची असल्यास त्यांनी दिनांक ०८/१०/२०२५ ते १७/१०/२०२५ या कालावधीत न.प. कार्यालय येथे हरकती सुचना दाखल करावी. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

मुख्याधिकारी
नगर परिषद वरोरा

## कार्यालय नगर परिषद हिंगणघाट, जि. वर्धा

Email id- hinganghatmc@gmail.com
Phone No.07153-245977

जा.क्र. नपहि/स्व.वि./कावी-३२०/२०२५
दिनांक : १४/१०/२०२५

### -: जाहीर ई-निविदा सुचना:-

स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० अंतर्गत नगर परिषद हिंगणघाट येथील सर्वे क्र. २५८ मध्ये (नांदगाव कंपोस्ट डेपो) येथे साठून असलेल्या जुन्या कचऱ्यावर बायोमायनिंग द्वारा प्रक्रिया करून कचऱ्याची विल्हेवाट लावणे व जमीन पुनर्प्राप्त करून घेणे कामा करीता योग्य वर्गात नोंदणीकृत/तत्सम कामाचा अनुभव असलेले जे पूर्व अहर्ता अटी पूर्ण करतील अश्या कंत्राटदाराकडून फक्त ऑनलाईन पद्धतीने ई- निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा नमुना महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक १५/१०/२०२५ पासुन पाहण्यास उपलब्ध आहे.

**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**नगर परिषद हिंगणघाट**

ऑफर घरा घरात... मना मनात... **पुण्य नगरी** ऑफर

**APPOINTMENT**

ऑफर साईज १० X ८ Sq.Cm.

### आता सवलतीच्या दरात

| | |
|---|---|
| विदर्भ | रु. ४९९९/- |
| मराठवाडा विभाग | रु. ४९९९/- |
| पश्चिम महाराष्ट्र | रु. ४९९९/- |
| उत्तर महाराष्ट्र | रु. ४९९९/- |
| मुंबईसह कोकण विभाग | रु. ४९९९/- |
| कोणतेही दोन विभाग | रु. ७४९९/- |
| कोणतेही तीन विभाग | रु. ११४९९/- |
| कोणतेही चार विभाग | रु. १५४९९/- |
| संपुर्ण महाराष्ट्र | रु. १९४९९/- |

वरील जाहिरातीच्या रकमेवर ५ % जीएसटी कर वेगळा द्यावा लागेल. | हे दर एप्रिल २०२५ पासून लागू. | स्पेशल दिवस : बुधवार/शनिवार

जाहिरातीसाठी फक्त एक मिस कॉल करा **18002081019**
E-mail:customercare@sapp.in